# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २६०–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. प्रताप सदाशिव भोसले ,<br>मु. पो. देवराष्टे, ता. कडेगाव, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, किर्लोस्करवाडी, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. प्रताप सदाशिव भोसले , मु. पो. देवराष्टे, ता. कडेगाव, जि. सांगली यांनी आपल्याला शेतात नवीन वीज पुरवठा मिळावा यासाठी वितरण कंपनी किर्लोस्करवाडी यांच्याकडे रितसर अर्ज करुन प्रोसेसिंग फी रु. ५०/– पावती क्र. ८६५६७७२ दि. २५.११.२००९ नुसार भरली. कृती मानके विनियमातील तरतुदीनुससार मुदतीत चलन दिले नाही म्हणून अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ५३० दि. २०.९.२०१० नुसार रितसर तक्रार दाखल केली. त्यामध्ये अंतर्गत कक्षाचे आदेश क्र . १०६७८ दि. २७.९.२०१० ला आदेश झाले आहेत. तक्रारदाराने मंचाकडे दि. १३.१०.२०१० ला दाखल केलेल्या तक्रारीमध्ये चलन मुदतीत न दिल्याने ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली.

वितरण कंपनीने आपल्या दि. २२.११.२०१० च्या लेखी अर्जात ग्राहकाचा वीज मागणी अर्ज शाखा कार्यालय, मोहिते वडगांव येथे दि. ९.१२.२००९ रोजी प्राप्त झाला. तेथील अधिकाऱ्यांकडे शाखा कार्यालय चिंचणीचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यांनी दि. १८.५.२०१० रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला. दुय्यम अभियंता श्री. गुरव हे दि. २३.६.२०१० रोजी रुजू झाले. त्यांनी दि. २०.१०.२०१० रोजी सर्व्हे क़ेला. अर्जदार ग्राहकास दि. २९.१०.२०१० रोजी चलन देण्यात आले. नवीन रुजू झालेले श्री. गुरव यांचेकडून कोणतीही दिरंगाई झालेली नाही. ग्राहकाने विलंबापोटी मागितलेली भरपाई देणेसाठी माफी देण्यात यावी.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २२.१२.२०१० रोजी सुनावणीस घेण्यात आली. ग्राहक गैरहजर. वि.प.चे अधिकारी श्री. व्हनमाने उपस्थित. ग्राहकास चलन देण्यात आले आहे, लवकरच वीज जोडणी देण्यात येईल. ग्राहक तक्रार मागे घेण्याची शक्यता आहे त्यामुळे म्हणणे देण्यास वि.प.ने दि. ३०.१२.२०१० पर्यत मुदत मागून घेतली. सहाय्यक अभियंता, किर्लोस्करवाडी उप विभाग यांचा मंचाला अग्रेषित दि. १२.१.२०११ चा अर्ज मंचात दि. १५.१.२०११ रोजी श्री. गुरव, शाखाधिकारी, मोहिते वडगांव यांनी हजर केला.ग्राहकाचा दि. १२.१.२०११ चा अर्ज सोबत जोडला आहे. ग्राहकाची त्यावर इंग्रजीत सही आहे. ग्राहकाच्या अर्जामध्ये शेतीपंप वीज कनेक्शनसाठी लागणारे पाच पोलचे काम वि.प.च्या किर्लोस्करवाडी उप विभागाने तात्काळ करुन दिले आहे. शेतीपंपाचे कनेक्शन मिळाले असल्यामुळे माझी वि.प.विरुध्द कोणतीही तक्रार उरली नाही. त्यामुळे मला कोणत्याही प्रकारची भरपाई नको, तक्रार मागे घेत आहे. यावरुन ग्राहकाच्या कामाची पूर्तता होवून गाऱ्हाणे दूर झाले आहे हे स्पष्ट होते. ग्राहकाने चलनाच्या विलंबासाठी भरपाईच्या रकमेचा आपला हक्क मागे घेत आहे, तक्रार मागे घेत असे म्हटले आहे. वीज जोडणी मिळाली आहे असे ग्राहकाने म्हटले आहे परंतु ती तारीख दिलेली नाही. मंचासमोर सुनावणीपूर्वी वीज जोडणी मिळाली कि नंतर याचा उल्लेख अर्जात नाही.

वितरण कंपनीकडे ग्राहकाचा अर्ज दि. ९.१२.२००९ प्राप्त झाला. वि.प.ने सर्व्हे करण्यास व चलन देण्यास उशीर केला आहे. संबंधित अधिकाऱ्याचा दि. १८.५.२०१० ला राजीनामा व दि. २३.६.२०१० ला नवीन रुजू झालेल्या अधिकाऱ्यास अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे दि. २९.१०.२०१० ला ग्राहकास कोटेशन देण्यात आले. अशा कुठल्याही कारणावरुन कृती मानकातील तरतुदीनुसार झालेला विलंब क्षम्य होत नाही. उलट दि. १०.१.२०१० पासून श्री. भामरे, कनिष्ठ अभियंता यांचा दि. १८.५.२०१० च्या राजीनाम्यापर्यंतचा कालाधीत ग्राहकाचा सर्व्हे करण्याचे काम दूर्लक्षित राहिले हे सिध्द होते. त्यामुळे कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार विलंबापोटी भरपाई मिळण्याचा ग्राहकास हक्क आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे. ग्राहकास वीज जोडणी मिळाल्यामुळे व ग्राहकाने तक्रार मागे घेतली असल्याने निकाली काढण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) ग्राहकाच्या दि. १५.१.२०११ च्या अर्जानुसार त्यांनी तक्रार मागे घेतली असल्याने निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.